बुधवार दि. १७ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २८६ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## उघडे चेंबर्स ठरताहेत मृत्यूचे सापळे; ढापे टाका अन्यथा; तीव्र आंदोलन छेडू- अशोक पडूळ

### मराठा महासंघाचे मनपा आयुक्त अंजली शर्मा यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी**

शहरातील लक्कडकोट ते देहेडकरवाडी, पेशवे चौक आणि कन्या शाळा ते दत्त मंदिर या अत्यंत वर्दळीच्या मार्गावर तसेच शहरातील अनेक भागात गटारींचे व पाईपलाईनचे चेंबर्स कित्येक महिन्यांपासून उघडे असून ते मृत्यूचे सापळे बनू पाहत आहेत. या खड्ड्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून, येत्या सात दिवसात त्यावर ढापे टाकावेत, अन्यथा जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मराठा महासंघाचे जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ यांनी दिला आहे.

अशोक पडूळ यांच्यासह मराठा महासंघ कामगार आघाडीचे मंगेश मोरे यांनी मंगळवार दि. १६ जून रोजी जालना महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती अंजलीजी शर्मा यांना निवेदन दिले आहे.



त्यात म्हटले आहे की, जालना शहरातील उघड्या चेंबर्स आणि नाल्यांमुळे दररोज लहान-मोठे अपघात घडत आहेत. अनेक दुचाकीस्वार यात पडून गंभीर जखमी झाले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, स्वतःच्या कुटुंबातील सदस्यालाही याचा मोठा फटका बसला असून, उघडा ढापा चुकवताना त्यांचा गंभीर अपघात घडला आहे. यावरून शहरातील परिस्थिती किती बिकट आहे, याची प्रचिती येते. प्रशासन आणखी किती नागरिकांचा बळी जाण्याची वाट पाहत आहे?, असा संतप्त सवाल या निवेदनातून विचारण्यात आला आहे.

शहरातील कसबा भागातील कन्यापाठ शाळेच्या समोर पाण्याचा निचरा करणारे एक प्रचंड मोठे मुख्य चेंबर (हौद) कित्येक दिवसांपासून उघडे आहे. येथे शाळकरी मुली, लहान मुले आणि पालकांची नेहमीच मोठी गर्दी असते. या चेंबरमध्ये यापूर्वी अनेक जनावरे, गायी आणि मोठ्या गाड्या फसल्या आहेत. सुदैवाने अजून मोठी जीवितहानी झाली नसली, तरी एखादी दुर्घटना घडल्यास याला जबाबदार कोण? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

आता पावसाळा तोंडावर आला आहे. पाऊस सुरू झाल्यावर रस्त्यांवर पाणी साचते, ज्यामुळे हे उघडे चेंबर्स आणि नाल्यांचे खड्डे दिसत नाहीत. संपूर्ण शहरात अनेक ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकल्यानंतर ढापेच गायब आहेत, तर पाईपलाईनच्या व्हॉल्वचे खड्डे उघडेच आहेत. येत्या ७ दिवसांत संपूर्ण शहराची पाहणी करून मजबूत ढापे बसवावेत, अन्यथा होणाऱ्या तीव्र आंदोलनाला आणि कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीला आयुक्त आणि प्रशासन सर्वस्वी जबाबदार राहील, असा इशारा अशोक पडूळ आणि मंगेश मोरे यांनी दिला आहे.

या गंभीर समस्येबाबत वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमांमध्ये वारंवार बातम्या प्रसिद्ध होऊनही महानगरपालिका प्रशासनाला अद्याप जाग आलेली नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. नागरिकांच्या कररूपी पैशातून पगार घेणारे प्रशासन जनतेच्या जिवाबाबत इतके उदासीन कसे असू शकते? असा सवालही पडूळ यांनी उपस्थित केला आहे.

या निवेदनाच्या प्रती माहितीसाठी महापौर आणि उपमहापौर यांनाही सादर करण्यात आल्या आहेत.

## सार्वजनिक बांधकाम विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक एसीबीच्या जाळ्यात

### कागदपत्र पडताळणीसाठी ४ हजारांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले

**जालना –प्रतिनिधी**

सुशिक्षित बेरोजगार परवाना (लायसन्स) मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून देण्याच्या मोबदल्यात लाचेची मागणी करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले. या कारवाईमुळे सार्वजनिक बांधकाम विभागात खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील आरोपी कृष्णा अशोकराव महिंद्रकर (वय ४७) हे सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना येथे स्थापत्य अभियांत्रिकी सहायक (वर्ग–३) म्हणून कार्यरत असून ते जालना शहरातील वाल्मीक नगर परिसरातील रहिवासी आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले असून सुशिक्षित बेरोजगाराच्या श्रेणीतील परवाना मिळविण्यासाठी त्यांनी २४ मार्च २०२६ रोजी ऑनलाइन अर्ज दाखल केला होता. त्यानंतर ९ जून २०२६ रोजी त्यांना ई–मेलद्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २, जालना येथे कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहण्यास सांगण्यात आले होते. तक्रारदार कागदपत्र पडताळणीसाठी कार्यालयात गेल्यानंतर आरोपी कृष्णा महिंद्रकर यांनी कागदपत्रांची पडताळणी करून परवाना प्रक्रियेसाठी मदत करण्याच्या बदल्यात ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. संबंधित व्यक्तीने याबाबत जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीची पडताळणी करण्यासाठी एसीबीने नियमानुसार पंचांसमक्ष मागणी पडताळणी प्रक्रिया राबविली. १६ जून २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ मधील आरेखक व नोंदणी शाखेत झालेल्या पडताळणीत आरोपीने ५ हजार रुपयांची मागणी केल्याचे तसेच तडजोडीअंती ४ हजार रुपये स्वीकारण्याच

**पोलीस तपास सुरू:**

या घटनेची माहिती मिळताच शेवली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. फिर्यादी संतोष राठोड यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (), २०२३ च्या कलम ३०४(२), ३०५() आणि ३३१(४) *(पान २ वर)*

## गडकरींनी वचनपूर्ती करावी, जालना-संभाजीनगर-औद्योगिक वसाहतींसाठी मेट्रो रेल्वे सुरू कराः अॅड. महेश धन्नावत

**जालना - प्रतिनिधी**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता म्हणून, काळाची गरज ओळखून जालना ते छत्रपती संभाजीनगर आणि पुढे शेंद्रा-बिडकीन-वाळूज ( मार्गे) या मार्गांना जोडणारी मेट्रो रेल्वे सेवा तातडीने सुरू करावी, अशी आग्रही मागणी अॅड. महेश धन्नावत यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. दोन्ही शहरांमधील रस्त्यावरील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली असून, यावर कायमस्वरूपी आणि आधुनिक तोडगा म्हणून मेट्रो रेल्वे हाच एकमेव प्रभावी पर्याय असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

अॅड. महेश धन्नावत यांनी वाहतुकीच्या गंभीर समस्येवर प्रकाश टाकत सांगितले की, ''जालना आणि छत्रपती संभाजीनगर ही मराठवाड्यातील दोन प्रमुख औद्योगिक शहरे आहेत. दररोज हजारो नागरिक, विशेषतः वाळूज, शेंद्रा आणि बिडकीन औद्योगिक वसाहतींमध्ये काम करणारे कामगार, व्यावसायिक आणि विद्यार्थी या मार्गावर प्रवास करतात. सकाळी आणि संध्याकाळी या रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात, ज्यामुळे प्रवाशांचा केवळ वेळच नाही, तर इंधनाचाही मोठा अपव्यय होतो. ही वाहतूक कोंडी या भागाच्या औद्योगिक विकासात एक मोठा अडथळा ठरत आहे. त्यामुळे मेट्रो रेल्वेसारखी वेगवान आणि सुरक्षित सार्वजनिक वाहतूक प्रणाली तातडीने राबवणे आवश्यक आहे.''

केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी यापूर्वी छत्रपती संभाजीनगरमधील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध प्रकल्पांची घोषणा केली होती. त्यांच्या विकासकामांच्या दूरदृष्टीमुळे या प्रदेशात पायाभूत सुविधांचे जाळे विस्तारत आहे. अॅड. धन्नावत यांनी नमूद केले की, पूर्वी एअर बस किंवा इतर पर्यायांवर चर्चा झाली असली तरी, सध्याच्या काळात वाढती लोकसंख्या आणि औद्योगिक विस्तार पाहता, मेट्रो रेल्वे हा अधिक व्यवहार्य आणि दूरगामी फायद्याचा प्रकल्प ठरेल.

या मागणीला केवळ जनसामान्यांचाच नाही, तर प्रशासकीय पातळीवरूनही दुजोरा मिळत आहे. सामाजिक कार्यकर्ते श्री. सुभाष देविदान आणि जालन्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती अस्मिता मित्तल यांनीदेखील यापूर्वी जालना ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान लोकल ट्रेन सुरू करण्याची गरज व्यक्त केली होती. यावरून या मार्गावर एका सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची किती नितांत आवश्यकता आहे, हे स्पष्ट *(पान २ वर)*

## पाऊस लांबल्याने टेंभुर्णी परिसरातील शेतकरी चिंताग्रस्त, मशागतीचा खर्च पाण्यात जाण्याची भीती

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी कृषी मंडळ आणि परिसरात जूनचा पंधरवडा उलटूनही पावसाने दडी मारल्याने खरीप पेरण्या ठप्प झाल्या आहेत. ऐन पावसाळ्यात उन्हाळ्यासारखा कडक उन्हाचा तडाखा कायम असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. पाऊस लांबल्याने यंदाचा खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली असून शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसला आहे.



मान्सून वेळेवर येईल या आशेने शेतकऱ्यांनी कर्ज काढून आणि दागिने गहाण ठेवून शेतीची मशागत वेळेत पूर्ण केली. ठिबक सिंचनाच्या भरवशावर कपाशीची लागवड करणारे शेतकरीही चिंताग्रस्त झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिझेल कमी वापरण्याबाबत काढलेला आदेश मशागतीच्या वेळी शेतकऱ्यांच्या मुळावर पडल्याचे बोलले जात आहे. ट्रॅक्टरसाठी लागणाऱ्या डिझेलचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याने अनेक शेतकऱ्यांना काळ्या बाजारातून जादा पैसे मोजून डिझेल खरेदी करावे लागले.

निसर्गाने पाठ फिरवल्याने हा लाखो रुपयांचा खर्च पाण्यात जाण्याची भीती आहे.

टेंभुर्णी, दहेगाव कुंभारझरी अकोला गाडेगव्हाण, तसेच परिसरातील काही शेतकऱ्यांनी मान्सूनपूर्व पावसाच्या भरवशावर कपाशीची लागवड आणि सोयाबीनची धूळपेरणी केली होती. मात्र, पाऊस न आल्याने जमिनीत असलेले महागडे बियाणे कडक उन्हामुळे मातीमोल होण्याच्या मार्गावर आहे. पाऊस आणखी लांबल्यास दुबार पेरणीचे मोठे आर्थिक संकट ओढावू शकते. सकाळपासूनच उन्हाच्या झळा लागत असल्याने विहिरी आणि बोअरवेलच्या पाण्याची पातळी खालावली असून जनावरांच्या चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर रूप धारण करू लागला आहे.

चौकट :- अनेक हवामान अंदाज तज्ञांनी थोड्या कमी प्रमाणात पाऊस पडेल असे सांगितले होते परंतु शेती ही निसर्गाच्या भरोशावर चालते या अंदाजाने शेतकऱ्यांनी पेरणी केलेली आहे ते पीक वाया जाण्याची भीती आता निर्माण झालेली आहे. असे संतोष आवटी यांनी आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले की शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याआधी त्यांना धीर दिला पाहिजे आणि योग्य वेळी पेरणी केली असे मार्गदर्शन केले पाहिजे.

## शिवसेना महिला आघाडीचा 'शिवदुर्गा संवाद दौरा' जालन्यात; महिला सक्षमीकरणासाठी व्यापक संवाद

### १७ जून रोजी भाग्यनगर येथे आयोजन; महिला पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि युवती सेनेच्या कार्यकर्त्यांना उपस्थितीचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी**

शिवसेना महिला आघाडीच्या वतीने महिला सक्षमीकरण, संघटन बळकटीकरण आणि विविध सामाजिक-राजकीय विषयांवर संवाद साधण्यासाठी 'शिवदुर्गा संवाद दौरा' आयोजित करण्यात आला असून हा दौरा बुधवार, दि. १७ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता भाग्यनगर येथील दर्शना बंगल्या जवळ संपन्न होणार आहे. या संवाद दौऱ्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवसेनेच्या प्रवक्त्या



सायना एन. सी. उपस्थित राहणार आहेत. तसेच खासदार ज्योतीताई वाघमारे, माजी आमदार सौ. संगीताताई ठोंबरे, शिवसेना उपनेत्या कला शिंदे, विजया पोटे आणि प्रीती बंड यांची विशेष उपस्थिती राहणार असून त्या महिला कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार आहेत.

या दौऱ्याच्या माध्यमातून महिला आघाडीचे संघटन अधिक सक्षम करण्यासोबतच महिलांच्या विविध सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि स्थानिक प्रश्नांवर चर्चा करण्यात येणार आहे. तसेच आगामी काळातील संघटनात्मक दिशा, महिलांचा राजकीय *(पान २ वर)*

## ७८१ ग्रामपचायतींचा माझं गाव आरोग्य संपन्न गांव या मोहिमेत सक्रीय सहभाग - डॉ.जयश्री भुसारे

**जालना - प्रतिनिधी**

माझं गांव आरोग्य संपन्न गांव या अभियानाची सुरुवात माहे एप्रिल २०२६ पासुन झाली. जिल्हयातील ७८१ ग्रामपंचायतीनी या अभियानामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला आहे. याद्वारे आपले गाव निरोगी, सशक्त व आरोग्य संपन्न व समृध्द होईल. आपण सामुदायिक एकत्रित प्रयत्न केल्यास आपल्या जिल्हयाला आरोग्य क्षेत्रात एक आदर्श स्थान मिळवुन देता येईल. ग्रामीण भागातील जनतेला दर्जेदार आरोग्य सेवा त्यांच्या स्तरावर उपलब्ध करुन देणे व आरोग्य दायी जीवनशैलीचा प्रसार करणे, हा या अभियानाचा प्रमुख उदेद् श




आहे. माझ गांव आरोग्य संपन्न गांव अभियान हे अत्यंत महत्वाचे आणि बदल घडविणारे पाऊल आहे.

ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे, जनतेमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करणे तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे. या अभियानामध्ये आपले आरोग्याचे मुल्यमापन करुन उत्कृष्ठ दर्जाची आरोग्य सेवा देणा-या ग्रामपंचायत, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय, पंचायत समिती, जिल्हा परिषद, राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तरावर रक्कम स्वरुपात राज्य शासनाकडुन पुरस्कार देण्यांत येणार आहे. गांवपातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना देण्यासाठी *(पान २ वर)*

## इंदेवाडी जलवाहिनीतील गळतीमुळे लाखो लिटर पाणी वाया

### आठ-आठ दिवस नळ कोरडे, तर दुसरीकडे अमूल्य जलसंपत्ती रस्त्यावर; नागरिकांमध्ये संताप

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या इंदेवाडी येथील टाकी परिसरात जलवाहिनी किंवा वितरण व्यवस्थेतील गळतीमुळे दररोज लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे चित्र समोर आले आहे. एकीकडे शहरातील नागरिकांना आठ-आठ दिवस नळाला पाणी मिळत नसताना, दुसरीकडे पिण्याचे अमूल्य पाणी रस्त्यावर वाहून जात असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



सध्या पावसाळा सुरू झाला असला तरी अपेक्षित पाऊस झालेला नाही. जिल्ह्यातील जलस्त्रोतांमध्ये समाधानकारक पाणीसाठा निर्माण झालेला नसल्याने पाणीटंचाईची चिंता कायम आहे. अशा परिस्थितीत जलवाहिन्यांमधील गळतीमुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जाणे ही गंभीर बाब मानली जात आहे.

**जालन्याची पाणीटंचाई :**

**वर्षानुवर्षे कायम असलेले संकट**

मराठवाड्यातील जालना जिल्हा हा नेहमीच दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या झळा सोसणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. उन्हाळा सुरू होताच अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या तीव्र होते. काही भागांत टँकरवर अवलंबून राहावे लागते, तर शहरातील अनेक नागरिकांना नियमित पाणीपुरवठ्याऐवजी आठ ते दहा दिवसांच्या अंतराने पाणी मिळते. पाण्याच्या एका थेंबासाठी नागरिकांना संघर्ष करावा लागत असताना लाखो लिटर पाणी *(पान २ वर)*

## संपादकीय...

### टेंभुर्णीचा नगरपंचायतीसाठी एल्गार; विकासाचा आक्रोश की प्रशासनावरील अविश्वास?

जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी गावाने आगामी ग्रामपंचायत निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा दिलेला इशारा हा केवळ एक राजकीय निर्णय नाही, तर तो ग्रामीण भागातील विकासाच्या अपेक्षा, प्रशासनावरील नाराजी आणि स्थानिक स्वराज्य व्यवस्थेतील मर्यादांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा महत्त्वाचा संदेश आहे.

ग्रामसभेत ''ग्रामपंचायत नको, आता फक्त नगरपंचायतच हवी'' असा उमटलेला एकमुखी आवाज हा अचानक निर्माण झालेला नाही. गावातील रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि वाढत्या नागरी गरजांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष झाल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे नगरपंचायतीची मागणी ही केवळ प्रशासकीय दर्जावाढ नसून, विकासाच्या नव्या चौकटीची मागणी आहे.

टेंभुर्णी हे जाफ्राबाद तालुक्यातील एक प्रमुख व्यापारी केंद्र आहे. लोकसंख्या वाढत आहे, बाजारपेठ विस्तारत आहे आणि ग्रामीण भागातून शहराकडे जाणाऱ्या संक्रमण प्रक्रियेत गावाची वाटचाल सुरू आहे. अशा परिस्थितीत ग्रामपंचायतीची पारंपरिक रचना आणि मर्यादित आर्थिक स्रोत विकासाच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपुरे पडत असल्याचे अनेकांचे मत आहे. नगरपंचायत झाल्यास अधिक निधी, नियोजनबद्ध विकास, स्वतंत्र प्रशासनिक यंत्रणा आणि नागरी सुविधांवर अधिक भर देता येईल, असा दावा मागणीकर्ते करीत आहेत. मात्र या प्रश्नाचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. कोणत्याही गावाला नगरपंचायतीचा दर्जा देण्यासाठी लोकसंख्या, महसूल, नागरीकरणाचे प्रमाण, भौगोलिक रचना आणि विविध कायदेशीर निकषांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे केवळ मागणी झाली म्हणून शासन तत्काळ निर्णय घेऊ शकत नाही. शासनाने वस्तुनिष्ठ निकषांवर निर्णय घेणे आवश्यक असते. त्यामुळे प्रशासनाची भूमिका आणि कायदेशीर प्रक्रिया यांचाही आदर राखणे तितकेच गरजेचे आहे. याचबरोबर निवडणूक बहिष्काराच्या निर्णयाकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणूक हा नागरिकांच्या हक्कांचा आणि सहभागाचा सर्वात प्रभावी मार्ग मानला जातो. बहिष्कार हा लोकशाहीतील असंतोष व्यक्त करण्याचा मार्ग असू शकतो; मात्र त्यातून समस्येचे कायमस्वरूपी समाधान मिळेलच असे नाही. उलट लोकप्रतिनिधी निवडण्याची प्रक्रिया ठप्प झाल्यास स्थानिक प्रशासन अधिक गुंतागुंतीचे होण्याची शक्यता असते.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवादाचा अभाव. जर नगरपंचायतीचा प्रस्ताव खरोखरच वरिष्ठ स्तरावर प्रलंबित असेल, तर त्याची सद्यस्थिती नागरिकांसमोर स्पष्ट होणे आवश्यक आहे. प्रस्ताव कोणत्या टप्प्यावर आहे? कोणत्या अडचणी आहेत? पुढील प्रक्रिया काय आहे? याची अधिकृत माहिती वेळोवेळी देण्यात आली असती, तर कदाचित आजची परिस्थिती निर्माण झाली नसती.

ग्रामसभेत काही सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि संघटनांच्या प्रतिनिधींनी स्थानिक प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले. हे आरोप गंभीर असले तरी त्यांची सत्यता संबंधित यंत्रणांनी तपासणे आवश्यक आहे. विकासाचा प्रश्न हा व्यक्ती किंवा गटांपुरता मर्यादित नसून संपूर्ण गावाच्या भवितव्याशी निगडित असतो. टेंभुर्णीची मागणी योग्य की अयोग्य, याचा अंतिम निर्णय शासन घेईल. मात्र या घटनेने एक गोष्ट स्पष्ट केली आहेग्रामीण महाराष्ट्रातील अनेक मोठी गावे आता पारंपरिक ग्रामपंचायतीच्या चौकटीपलीकडे जाऊन अधिक सक्षम नागरी प्रशासनाची अपेक्षा करू लागली आहेत. त्यामुळे अशा गावांच्या गरजा, वाढती लोकसंख्या आणि बदलते सामाजिक-आर्थिक वास्तव लक्षात घेऊन शासनाने व्यापक धोरण आखण्याची गरज आहे.

फरारी आरोपी सतिश जैस्वाल अखेर जाळ्यात

## न्यायालयाने सुनावली तीन दिवसांची पोलीस कोठडी

**जालना – प्रतिनिधी**

जिल्ह्यातील फरारी आरोपींचा शोध घेण्यासाठी जालना पोलीस दलाकडून सुरू असलेल्या विशेष मोहिमेला आणखी एक मोठे यश मिळाले असून, चंदनझिरा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील फरारी आरोपी सतिश जैस्वाल उर्फ 'लाला' यास धुळे जिल्ह्यातील सोनगीर टोलनाका परिसरातून अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी रचलेल्या नियोजनबद्ध सापळ्यात आरोपी अडकला असून, या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमध्ये खळबळ उडाली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या निर्देशानुसार फरारी आरोपींविरुद्ध विशेष शोध मोहीम राबविण्यात येत आहे. विविध गुन्ह्यांमध्ये फरार असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात आली असून, त्यांना आधुनिक तांत्रिक साधनांची मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याच मोहिमेअंतर्गत पोलिसांना सतिश जैस्वाल उर्फ लाला याच्या हालचालींबाबत महत्त्वाची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीच्या संपर्कातील व्यक्ती, त्याच्या हालचाली आणि संभाव्य प्रवासमार्ग यांचे तांत्रिक विश्लेषण केले. मोबाईल लोकेशन व इतर तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी धुळे जिल्ह्यातील सोनगीर टोलनाका परिसरातून जाणार असल्याची खात्री पोलिसांना मिळाली. त्यानुसार विशेष पथकाने सोनगीर टोलनाका परिसरात गुप्तपणे सापळा रचला.

काही वेळ प्रतीक्षा केल्यानंतर आरोपी संबंधित वाहनातून तेथे पोहोचताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. या कारवाईदरम्यान आरोपीच्या ताब्यातील एमएच–२९ सीजी–१०९२ क्रमांकाचे वाहन जप्त करण्यात आले. पोलिसांनी कोणताही अनुचित प्रकार घडू न देता अत्यंत शिताफीने ही कारवाई पार पाडली.

यावेळी आरोपीसोबत असलेला शकील अमीन पठाण (रा. जालना) यालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. आरोपीच्या फरारी काळातील हालचाली, त्याला मिळालेली मदत आणि इतर संभाव्य संबंध याबाबत पोलिसांकडून सखोल चौकशी सुरू असल्याचे समजते.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सतिश जैस्वाल उर्फ लाला याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल आहे.

## अप्पर तहसील कार्यालय यादीतून सेवलीला डावलल्या प्रकरणी वंचित बहुजन आघाडी आक्रमक आ.लोणीकर यांच्या विरोधात निषेध आंदोलन

**जालना - प्रतिनिधी**

तालुक्यातील सेवली येथे एस.सी,.एस.टी, ओबीसी, मुस्लिम बहुसंख्येने असल्यामुळे शासना कडून नुकत्याच जाहीर झालेल्या अप्पर तहसील कार्यालयाच्या यादीत आमदार बबनराव लोणीकर यांनी सेवलीची शिफारस केल्याचा बनाव करून व्देष भावनेतून जाणिवपूर्वक डावलले आहे.




या अन्यायाच्या विरोधात एस.सी. एस.टी.ओबीसी व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दिनांक १६ जुन २०२६ रोजी सेवली येथे एक दिवसीय धरणे आंदोलन वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांच्या नेतृत्वाखाली आयोजन करण्यात आले होते यावेळी वंचित बहुजन आघाडीचे व गावातील प्रतिष्ठित पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी शासनाच्या व आ.बबनराव लोणीकर यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली सेवलीला अप्पर तहसील कार्यालय मंजुरी न दिल्यास आंदोलन अधिक तिव्र करण्यात येईल असा इशारा देण्यात आला याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके, सतिश गुमे, बबन मेहेत्रे,अतुल शेवलीकर, शरद तळेकर, अशोक तळेकर लक्ष्मण राठोड, दिलीप बिबे, भगवान मघाडे, मुकुंद काळे, शत्रुघ्न कोळी अनिल खाडे, दत्ता खाडे,रोशन सदावर्ते किरण काळे,लखन सदावर्ते, शहाजी खाडे,सुनील काळे, संतोष खाडे, गौतम मगर, प्रसाद सदावर्ते दिलीप मगर,अर्जुन घुगे,संतोष खाडे ,विकास सदावर्ते, सुरेश काळे बाबासाहेब लहाने संतोष मगर, मदन डोके, करण डोके, दिपक उघडे, आत्माराम तुरेराव, अरूण काकडे, मधुकर शेजुळ, पांडुरंग दाहीजे, किशोर खारकरी, लिंबाजी गिरी, गणेश मोरे, इंद्रजीत जोशी, मच्छिंद्र काळे, अशोक काळे प्रकाश कायंदे, विष्णु राठोड, अमोल नांगरे, संदिप केंद्रे, विकास सदावर्ते यांच्या सह मोठ्या संख्येने बांधव सहभागी होते.

पान १ व ४ वरुन....

### सार्वजनिक बांधकाम...

अन्वये गुन्हा ( . ०१०४/२०२६) दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक () सलीम महमद शेख करत आहेत. ग्रामीण भागात झालेल्या या मोठ्या चोरीमुळे पाहेगाव आणि परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून चोरट्यांचा तात्काळ शोध घेण्याची मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

यानंतर एसीबीच्या पथकाने त्याच दिवशी सापळा रचला. तक्रारदाराकडून ४ हजार रुपयांची लाचेची रक्कम स्वीकारून ती आपल्या टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवताच आरोपी कृष्णा महिंद्रकर यांना रंगेहात पकडण्यात आले. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

कारवाईदरम्यान आरोपीची अंगझडती घेण्यात आली असता एक मोबाईल फोन, ड्रॉवरमध्ये ठेवलेली ४ हजार रुपयांची लाचेची रक्कम तसेच इतर २ हजार ३४० रुपये असा मुद्देमाल मिळून आला. यानंतर आरोपीच्या निवासस्थानी घरझडतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या प्रकरणी आरोपी कृष्णा अशोकराव महिंद्रकर यांच्याविरुद्ध जालना येथील सदर बाजार पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती एसीबीकडून देण्यात आली.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक माधुरी केदार कांगणे आणि अपर पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सापळा अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांनी काम पाहिले. त्यांना पोहेकॉ. गजानन घायवट, पोलीस अंमलदार गणेश चेके, अमोल चेके तसेच चालक भालचंद्र बिनोरकर यांनी सहकार्य केले. नागरिकांना एसीबीचे आवाहन

शासकीय कार्यालयांमध्ये कोणताही लोकसेवक स्वतः किंवा इतरांच्या माध्यमातून शासकीय कामासाठी लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारींसाठी विभागाचा दूरध्वनी क्रमांक ०२४८२–२२०२५२, टोल फ्री क्रमांक १०६४ तसेच मोबाईल क्रमांक ९७६४०२१०६४ उपलब्ध आहे.

### गडकरींनी वचनपूर्ती...

होते. ॲड. धन्नावत यांनी सांगितले की, ''प्रशासकीय अधिकाऱ्यांची आणि सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी ही समस्येच्या तीव्रतेचे द्योतक आहे आणि मेट्रो रेल्वे हा त्यावर एक ठोस उपाय ठरू शकतो.''

जालना हे स्टील उद्योग आणि ड्राय पोर्टचे केंद्र म्हणून वेगाने विकसित होत आहे, तर छत्रपती संभाजीनगर हे दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. मेट्रो रेल्वेमुळे ही दोन्ही शहरे आणि त्यांच्या औद्योगिक वसाहती थेट जोडल्या जातील, ज्यामुळे संपूर्ण मराठवाड्यात औद्योगिक विकासाला प्रचंड गती मिळेल. यामुळे केवळ प्रवासाची सोय होणार नाही, तर प्रदूषण आणि अपघातांचे प्रमाण कमी होऊन नागरिकांचे जीवनमान सुधारेल.

ॲड. महेश धन्नावत यांनी शेवटी श्री. नितीन गडकरी यांना त्यांच्या वचनबद्धतेची आठवण करून देत आवाहन केले की, ''श्री. गडकरी हे देशात जागतिक दर्जाचे पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यासाठी ओळखले जातात. त्यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी पाहिलेले आधुनिक वाहतुकीचे स्वप्न आता मेट्रो रेल्वेच्या माध्यमातून साकार करावे. प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन जालना-छत्रपती संभाजीनगर-डीएमआयसी कॉरिडॉर मेट्रो प्रकल्पाला मंजुरी द्यावी, हीच या भागातील लाखो नागरिकांची अपेक्षा आहे.''

### शिवसेना महिला आघाडीचा...

सहभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नेतृत्व आणि महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

शिवसेना महिला आघाडीने जालना विधानसभा मतदारसंघातील सर्व आजी-माजी पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेविका, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच युवती सेना कार्यकर्त्यांना या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

महिलांच्या सहभागातून संघटन अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा संवाद दौरा जालना शहरातील महिला नेतृत्वासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत शिवसेना महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

### ७८१ ग्रामपचायतींचा...

आरोग्य विषयक सामाजिक वर्तणुकीत बदल व आरोग्यदायी जीवनशैली रुजविण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरणार असुन सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन यासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनविणे हे या अभियाने उदिद्□ ष्ट आहे.

जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतींनी सक्रीय सहभाग व प्रत्यक्ष आरोग्य कार्यक्रमाची अंमलबजावणी झाल्यास या महत्वकांक्षी अभियानाद्वारे जिल्हयातील ग्रामपंचायत गांवे निक्कीचं आरोग्य संपन्न होईल यात शंका नाही.

### इंदेवाडी जलवाहिनीतील...

गळतीतून वाया जाणे ही केवळ तांत्रिक त्रुटी नसून प्रशासनाच्या दुर्लक्षाचे द्योतक असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. ''जल आहे तर जीवन आहे'' पण प्रत्यक्षात काय?

पाणी हे जीवनाचे मूलभूत आधार आहे. मानव, पशुपक्षी, शेती, उद्योग आणि पर्यावरण या सर्वांचे अस्तित्व पाण्यावर अवलंबून आहे. जागतिक स्तरावर पाण्याची टंचाई वाढत असताना पाणी संवर्धनावर भर दिला जात आहे. शासन विविध मोहिमा राबवून पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्याचे आवाहन करीत आहे. मात्र ज्या शहरात नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही, त्याच शहरात प्रशासनाच्या देखरेखीअभावी लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे चित्र समोर येत असल्याने ''पाणी अडवा, पाणी जिरवा'' आणि ''पाणी वाचवा'' या घोषणांची अंमलबजावणी नेमकी कोण करणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

**गळतीची माहिती प्रशासनाला नव्हती का?**

इंदेवाडी टाकी परिसरातील गळती नवीन नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. दीर्घकाळापासून पाणी वाहून जात असल्याचा दावा नागरिक करीत आहेत. जर हे खरे असेल तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना याची माहिती नव्हती का? नियमित पाहणी केली जात नाही का? गळतीचे निदान करून तत्काळ दुरुस्ती का करण्यात आली नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर देखरेख ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांसह पाणीपुरवठा सभापती यांच्या निदर्शनास ही बाब वेळेत का आली नाही, याबाबतही नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत.

आर्थिक नुकसानही तितकेच गंभीर

पिण्याचे पाणी शुद्ध करण्यासाठी, साठवण्यासाठी आणि नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महापालिकेला मोठा खर्च करावा लागतो. वीज, यंत्रणा, मनुष्यबळ आणि देखभाल यावर लाखो रुपये खर्च होतात. अशा वेळी गळतीमुळे वाया जाणारे पाणी म्हणजे केवळ जलसंपत्तीचेच नव्हे तर सार्वजनिक पैशांचेही नुकसान असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

तातडीने कारवाईची मागणी

इंदेवाडी परिसरातील गळती तात्काळ दुरुस्त करून पाणी वाया जाणे थांबवावे, शहरातील सर्व जलवाहिन्यांचे सर्वेक्षण करून गळतीचे ठिकाण शोधावे आणि जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

जालना शहरातील हजारो कुटुंबे पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी प्रतीक्षा करीत असताना दुसरीकडे लाखो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात असेल, तर ही परिस्थिती चिंताजनकच नव्हे तर प्रशासनासाठी आत्मपरीक्षणाची बाब आहे. पाणीटंचाईच्या संकटाशी झुंज देणाऱ्या जालन्यासाठी आता केवळ आश्वासने नव्हे, तर प्रभावी आणि तातडीची कृती आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### टेंभुर्णी जिल्हा...

कौतुक केले. यावेळी जाफ्राबाद गटशिक्षण विस्तार अधिकारी राम खराडे, शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत शिंदे, रावसाहेब अंभोरे, गौतम चंदनशिवे, रेखा जमधडे आणि मुक्ताबाई जमधडे आदी उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी...

शैक्षणिक वातावरण राखण्याचे देखील निर्देश शाळा प्रशासनाला दिले. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

### अहिल्यादेवी...

नियमित शिक्षण घेऊन उज्वल भवितव्य घडविण्याचा संदेश दिला. प्रवेशोत्सवामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

### जाफराबाद तालुक्यातील...

इतर पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

प्रशासनाकडून अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात सातत्याने कठोर कारवाया करण्यात येत असून भविष्यातही अशा कारवाया अधिक तीव्रतेने सुरू राहतील, असा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांकडून महसूल व पोलीस प्रशासनाच्या या धडक कारवाईचे स्वागत करण्यात येत आहे.

### दामिनी पथकाची...

पावले उचलत दामिनी पथकाला अधिक सक्रिय केले आहे.

**गर्दीच्या ठिकाणी विशेष नजर**

मोतीबाग चौपाटी, छत्रपती संभाजी महाराज उद्यान, महाविद्यालय परिसर तसेच युवक-युवतींची मोठी वर्दळ असलेल्या भागांमध्ये दामिनी पथकाकडून नियमित गस्त घालण्यात येत आहे. मोहिमेदरम्यान संशयास्पद हालचाली करणाऱ्या युवकांची चौकशी करण्यात आली. काही युवकांना सार्वजनिक ठिकाणी महिलांशी गैरवर्तन केल्यास होणाऱ्या कायदेशीर परिणामांची माहिती देऊन समज देण्यात आली.

पोलिसांनी स्पष्ट केले की, महिलांना त्रास देणे, पाठलाग करणे, अश्लील हावभाव करणे किंवा सार्वजनिक ठिकाणी असुरक्षित वातावरण निर्माण करणे अशा प्रकारांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये संबंधितांवर थेट गुन्हे दाखल करण्यासह कठोर कारवाई केली जाईल.

महिला सुरक्षिततेबाबत जनजागृती

दामिनी पथक केवळ कारवाईपुरते मर्यादित न राहता शाळा, महाविद्यालये आणि विविध शैक्षणिक संस्थांमध्ये जाऊन महिला सुरक्षिततेबाबत जनजागृती करत आहे. विद्यार्थिनींना त्यांच्या हक्कांची माहिती, कायदेशीर संरक्षण, सायबर गुन्ह्यांपासून बचाव तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांशी संपर्क साधण्याबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

महिलांनी कोणत्याही प्रकारच्या छेडछाडीला घाबरून न जाता तात्काळ तक्रार नोंदवावी, असे आवाहनही पथकाकडून करण्यात येत आहे. अशा घटनांची माहिती मिळाल्यास संबंधितांविरोधात तत्काळ कारवाई केली जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम

ही विशेष मोहीम जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंहा संधू यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. मोहिमेत दामिनी पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक गणेश शिंदे यांच्यासह महिला पोलीस कर्मचारी सिंधू खर्जुले, वंदना साळवे, जयश्री म्हसके आणि बोराडे यांनी सक्रिय सहभाग घेतला.

हेल्पलाईनवर तक्रार करण्याचे आवाहन

जालना शहरातील तरुणी व महिलांची कुणी छेड काढत असल्यास, पाठलाग करत असल्यास किंवा कोणत्याही प्रकारचा त्रास देत असल्यास त्यांनी दामिनी पथकाच्या ९८२२१७१९१८ या हेल्पलाईन क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन पथकाच्या वतीने करण्यात आले आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी दामिनी पथक २४ तास सज्ज असून नागरिकांनीही अशा प्रकारांविरोधात पुढे येऊन पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

### जालना येथे...

हा अन्नदाता असून त्याला कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता दिलासा देणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. प्रत्येक ७/१२ धारक शेतकऱ्याला संपूर्ण कर्जमाफी देऊन त्यांचे आर्थिक पुनर्वसन करावे, अशी मागणी शेतकरी विकास मंचाने केली आहे.

यावेळी शेतकरी विकास मंचाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शासनाने शेतकरी हिताचा विचार करून कर्जमाफीच्या निकषांमध्ये तातडीने सुधारणा करावी, अशी मागणी त्यांनी केली. याप्रसंगी शेतकरी विकास मंच जालना जिल्हाध्यक्ष पठाण अमानुल्लाह, नेर शाखाध्यक्ष शेख युसुफ, उपाध्यक्ष हरिभाऊ शिंदे, विजय राठोड, बाळू राठोड, संजय वढेकर, खाजा पठाण, शेख रियाजुद्दीन, सुदर्शन सहाणे, भरत सहाणे, मधुकर कुरेवाड, प्रकाश पवार, निवृत्ती कुलवंत, गजानन भुतेकर, नारायण काकडे, सुनील राठोड,सागर अहिरे आदी उपस्थित होते.

### अल्पसंख्यांक संरक्षण...

असंख्य घटना दररोज या देशात घडत असतात,यापासून कुठे तरी समाजाचे संरक्षण झाले पाहिजे आणि ॲट्रासिटी सारखा कायदा झाला पाहिजे यासाठी गेल्या काहीं महिन्यांपासून निमंत्रक ॲड.प्रा. इलियास इनामदार यांच्या प्रयत्नाने व मुजतबा खान सर आणि शेख मुसा सर यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पसंख्याक संघर्ष समितीच्या मार्फत बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात समितीने उपोषणे,आंदोलने व दौरे केली आहेत आणि हाच लढा मोठ्या प्रमाणावर उभा करण्यासाठी येणाऱ्या अधिवेशनात अल्पसंख्याक संरक्षण संघर्ष समितीच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येणार असून या आंदोलनात राज्यभरातील अल्पसंख्यांक समाजातील लोकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष तथा समितीचे सदस्य प्रा. अमर शेख यांनी केले आहे.

# माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली,सभापती राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चालू आर्थिक वर्षात ०२ कोटी १२ लाख रुपयांचे बाजार समितीच्या इतिहासातील सर्वाधिक उत्पन्न

## राहुल लोणीकर यांनी सभापती पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून कृषी उत्पन्न बाजार समितीची दमदार कामगिरी

**परतुर - प्रतिनिधी**

परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सूत्रे हाती घेतल्यापासून माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सभापती राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाने उत्तम कामगिरी केलेली असून चालू आर्थिक वर्षामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीने ०२ कोटी १२ लक्ष उत्पन्न मिळवले असून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेपासून आत्तापर्यंत कृषी उत्पन्न बाजार समितीने उत्पन्नाचा एवढा टप्पा कधीही गाठला नव्हता या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीमध्ये आज सभापती राहुल लोणीकर यांचा सर्व संचालकांच्या वतीने व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवासह कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला

गेल्या वर्षी कृषी उत्पन्न बाजार समितीने चांगली कामगिरी करत एक कोटी ५५ लाख उत्पन्न मिळवले होते मात्र यावर्षी तब्बल ६६ लाख रुपयांची वाढ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नात झाली असून ०२ कोटी १२ लाख रुपये इतके उत्पन्न झालेले असून त्याचे संपूर्ण श्रेय सभापती राहुल लोणीकर उपसभापती व त्यांच्या सर्व संचालक मंडळात जाते

ज्यावेळी सभापती म्हणून राहुल लोणीकर यांनी पदभार स्वीकारला होता त्यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्न केवळ ९६ लक्ष रुपये होते मात्र गेल्या तीन वर्षात हा आलेख राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात चढत गेला असून त्यामुळे येत्या काळात लवकरच परतूर कृषी उत्पन्न बाजार समितीला अ दर्जा प्राप्त होणार आहे.



यावेळी संचालक मंडळाला संबोधित करताना सभापती राहुल लोणीकर म्हणाले की, कृषी उत्पन्न बाजार समिती ही खऱ्या अर्थाने शेतकरी वर्गाच्या हितासाठी असून व्यापारी व शेतकरी समन्वय राखत हा प्रगतीचा टप्पा आपण गाठू शकलो असल्याचे सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की पश्चिम महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या धर्तीवर परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचा विकास करण्याचा आपला प्रयत्न असून सर्व संचालक मंडळ ही या कामांमध्ये सदैव खंबीर भूमिका घेत असल्यामुळे हे यश मिळाले असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले यापुढेही प्रगतीचा आलेख उंचावत जाऊन शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यावर आपला भर राहणार असल्याचे राहुल लोणीकर यांनी सांगितले पुढे बोलताना सभापती राहुल लोणीकर म्हणाले की लवकरच वाटूर उपबाजार पेठ येथे शेतकऱ्यांसाठी शेतकरी भवन उभारले जाणार असून, पुढील वर्षी सातोना येथे शेतकरी भवन उभारण्याचा संकल्प असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की शेतकऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे सांगत टप्प्याटप्प्याने कृषी उत्पन्न बाजार समितीला विकसित करण्याचा आपला मानस असल्याचे ते म्हणाले.

पुढे ते म्हणाले की, व्यापारी आणि शेतकऱ्यांना सोयीस्कर होईल अशी एकत्रित बाजारपेठ निर्माण करण्याचा आपला प्रयत्न असून, या प्रयत्नाला यश मिळाल्यास निश्चितच परतूर कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचा आणि व्यापाऱ्यांचा मोठा फायदा होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला पुढे बोलताना ते म्हणाले की, आपण गेल्या तीन वर्षांपूर्वी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सूत्रे हाती घेतल्यापासून क्रमाक्रमाने कृषी उत्पन्न बाजार समितीचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला असून आज उत्पन्नात एवढी भरीव वाढ झाल्याचा आपल्याला आनंद असून यापुढेही बाजार समितीच्या उत्पन्न वाढीसाठी व शेतकऱ्यांच्या सुविधांसाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी उपसभापती संभाजी वारे, लक्ष्मणराव टेकाळे आप्पासाहेब खोसे बालासाहेब आकात पाराजी मुळे गुलाबराव अवचार शहाजी राक्षे हरिराम माने मदनराव हजारे, मेराजुद्दीन खतीब पद्माकर कवडे प्रशांत बोनगे गणेश आंबेकर नितीन जोगदंड सत्यनारायण अग्रवाल दिनेश होलानी विजय वाणी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव रामकिसन लिपणे यांची उपस्थिती होती.

# जालना पोलिसांची मोठी कारवाई : सराईत वाळू तस्कर पंकज सोळुंके एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध

## वर्षभरासाठी मध्यवर्ती कारागृहात रवानगी; गोंदी पोलिस व पोलीस अधीक्षक पथकाची संयुक्त कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अवैध वाळू तस्करी, दहशत आणि गंभीर गुन्हेगारी कारवायांवर आळा घालण्यासाठी जालना पोलिसांनी मोठी कारवाई करत सराईत वाळू तस्कर पंकज सखाराम सोळुंके (वय ३७, रा. गोंदी, ता. अंबड) याच्यावर महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा (एमपीडीए) अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार त्याला एक वर्षासाठी मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले आहे.

पंकज सोळुंके हा जिल्ह्यातील कुख्यात वाळू तस्कर म्हणून ओळखला जात असून त्याच्याविरुद्ध शरीराविरुद्धचे गंभीर गुन्हे, वाळू चोरी, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, लोकसेवकांवर हल्ला करून दुखापत करणे, शिवीगाळ, जीवे मारण्याच्या धमक्या देणे, खुनाचा प्रयत्न, अवैध वाळू तस्करी तसेच सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना अडवून मारहाण करणे अशा स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**प्रतिबंधात्मक कारवाईनंतरही सुधारणा नाही**

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, पंकज सोळुंके याच्यावर यापूर्वी अनेक वेळा प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात आल्या होत्या. मात्र त्याच्या वर्तनात कोणतीही सुधारणा होत नसल्याने आणि त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हिडीओ पायरट्स, वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी असलेल्या एमपीडीए अधिनियम १९८१ अंतर्गत त्याच्यावर स्थानबद्धतेचा प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला होता.

सदर प्रस्तावाची छाननी केल्यानंतर जिल्हादंडाधिकारी, जालना यांनी दि. २ जानेवारी २०२६ रोजी स्थानबद्धतेच्या प्रस्तावास मंजुरी दिली होती.

**पोलिसांना चकवा देत होता आरोपी**

स्थानबद्धतेचा आदेश मंजूर झाल्यानंतर गोंदी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी आरोपीच्या मागावर होते. मात्र पोलिसांच्या हालचालींची खबर लागताच तो वारंवार ठिकाण बदलून पसार होत असल्याने त्याला ताब्यात घेणे आव्हानात्मक ठरत होते.

अखेर दि. १३ जून २०२६ रोजी पोलीस अधीक्षक पथक आणि गोंदी पोलिसांनी संयुक्त मोहीम राबवत गुप्त माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांच्या मदतीने आरोपीचा ठावठिकाणा शोधून काढला. छत्रपती संभाजीनगर शहरातील जवाहरनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून त्याला ताब्यात घेण्यात आले.

**वर्षभरासाठी कारागृहात रवानगी**

आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली. त्यानुसार पंकज सोळुंके यास एक वर्षासाठी स्थानबद्ध करून मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल करण्यात आले.

पोलिसांच्या या कारवाईमुळे अवैध वाळू तस्करी करणाऱ्या तसेच गंभीर गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी आणि अंबड उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सिद्धेश्वर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत गोंदी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गुरले, पोलीस उपनिरीक्षक हरी जंगले, सहाय्यक फौजदार फुलचंद हजारे तसेच पोलीस अधीक्षक पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश गडाख, सहाय्यक फौजदार बरडे, पोलीस हवालदार कोकणे, पोलीस कॉन्स्टेबल हरबक, बकाल, हळदे, बोराडे, पोलीस हवालदार सागर बावीस्कर आणि संदीप मांटे यांनी सहभाग घेतला.

**अवैध वाळू तस्करीविरोधात पोलिसांचा इशारा**

जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन आणि तस्करीमुळे पर्यावरणीय हानीबरोबरच कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत असल्याने अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा स्पष्ट इशारा जालना पोलिसांनी दिला आहे. एमपीडीएसारख्या कठोर कायद्याअंतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईमुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले असून जिल्ह्यातील अवैध वाळू व्यवसायावर मोठा आघात मानला जात आहे.

# विमा कंपन्यांच्या मनमानीला चाप! केवळ संशयावरून विमा दावा नाकारता येणार नाही – दिल्ली राज्य ग्राहक आयोगाचा महत्त्वपूर्ण निकाल

दिल्ली राज्य ग्राहक विवाद निवारण आयोगाने एका महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले आहे की, केवळ संशयाच्या आधारावर आणि ठोस वैद्यकीय पुराव्यांशिवाय विमाधारकाचा दावा पूर्व-विद्यमान आजार असल्याचे कारण देऊन नाकारता येणार नाही. न्यायमूर्ती संगीता धिंग्रा सहगल (अध्यक्ष) आणि बिमला कुमारी (सदस्य) यांच्या खंडपीठाने रेलिगेअर हेल्थ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने दाखल केलेले अपील फेटाळून लावले. आयोगाने म्हटले की, रुग्णालयाच्या तात्पुरत्या नोंदी किंवा केवळ लक्षणांच्या आधारावर माहिती लपवल्याचा निष्कर्ष काढता येत नाही, विशेषतः जेव्हा निदान चाचण्यांमध्ये तो आजार सिद्ध झालेला नाही. आयोगाच्या या निर्णयामुळे विमा कंपन्यांच्या मनमानी कारभाराला मोठा धक्का बसला आहे.

या प्रकरणात, तक्रारदार सुभाष चंद गुप्ता यांनी रेलिगेअर हेल्थ इन्शुरन्स कंपनीकडून दोन वर्षांसाठी ४९,७८३ रुपये प्रीमियम भरून मेडिक्लेम पॉलिसी घेतली होती. पॉलिसी घेताना त्यांनी आपल्या पत्नीला हायपोथायरॉईडीझमचा त्रास असल्याची माहिती दिली होती आणि विमा कंपनीने वैद्यकीय तपासणी केल्यानंतरच पॉलिसी जारी केली होती. २५ जून २०१५ रोजी, तक्रारदाराच्या पत्नीला छातीत दुखू लागल्याने मॅक्स रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांची अँजिओग्राफीसह इतर तपासण्या करण्यात आल्या. उपचारांनंतर त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आणि कोणत्याही गंभीर आजाराचे निश्चित निदान झाले नाही. या उपचारांसाठी तक्रारदाराला सुमारे ७४,२१९ रुपये खर्च आला.

तक्रारदाराने खर्चाच्या भरपाईसाठी विमा कंपनीकडे दावा दाखल केला. तथापि, विमा कंपनीने २७ ऑगस्ट २०१५ रोजी हा दावा फेटाळून लावला. कंपनीने आरोप केला की, विमाधारकाने पॉलिसी घेताना क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज () आणि डिस्पनिया ऑन एक्झर्शन () यांसारख्या पूर्व-विद्यमान आजारांची माहिती लपवली होती, ज्यामुळे पॉलिसीच्या अटी व शर्तींचे उल्लंघन झाले. या निर्णयाविरोधात तक्रारदाराने जिल्हा ग्राहक आयोगात धाव घेतली, जिथे त्यांच्या बाजूने निकाल लागला. जिल्हा आयोगाने विमा कंपनीला ७४,२१९ रुपये आणि चुकीच्या पद्धतीने दावा नाकारल्याबद्दल २५,००० रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले होते. या आदेशाला विमा कंपनीने राज्य आयोगात आव्हान दिले होते. राज्य आयोगाने आपल्या निरीक्षणात म्हटले की, पॉलिसी घेताना विमाधारकाला कोणताही पूर्व-विद्यमान आजार होता, हे सिद्ध करण्यात विमा कंपनी पूर्णपणे अपयशी ठरली आहे. कंपनीने ज्या वैद्यकीय नोंदींचा आधार घेतला, त्या केवळ तात्पुरत्या स्वरूपाच्या होत्या आणि त्यात आजाराचे निश्चित निदान झालेले नव्हते. अँजिओग्राफीसारख्या चाचण्यांमध्येही किंवा सारखा कोणताही आजार असल्याचे सिद्ध झाले नाही. केवळ संशयास्पद नोंदींना आजाराचा पुरावा मानले जाऊ शकत नाही.

# जि. प. प्राथमिक शाळा प्रल्हादपूर येथे प्रवेश उत्सव उत्साहात संपन्न; नवगतांचे जल्लोषात स्वागत

**जालना - प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभारंभाच्या निमित्ताने प्रल्हादपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रवेश उत्सव मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेत नव्याने दाखल झालेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ आणि गोड खाऊ देऊन अत्यंत आनंदमयी वातावरणात स्वागत करण्यात आले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणारी मोफत पाठ्यपुस्तके



व मोफत शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. नव्या कोऱ्या पुस्तकांचा सुगंध आणि नवीन गणवेश मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद पाहायला मिळाला.

या प्रवेश उत्सवाच्या विशेष कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. विष्णू पाटील गाढे, शालेय शिक्षण तज्ञ श्री. आप्पासाहेब जाधव, ताईराम नामदे,विजय नामदे,संभाजी नामदे, यांच्यासह समस्त शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन शाळेचे मुख्याध्यापक श्री. गजानन कुटे सर आणि सहशिक्षक श्री. गणेश बरडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून, गावामध्ये शिक्षणाविषयी अत्यंत सकारात्मक व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मंत्रिमंडळ निर्णय (एकूण निर्णय – ५ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग नागपूरला हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रोन प्रकल्पाची स्थापना

## कर्करोगावरील उपचार, संशोधनाला मिळणार चालना

**नागपुर - प्रतिनिधी**

नागपूर येथे हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रोन प्रकल्प (एचईएमसीपी) स्थापन करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या प्रकल्पासाठी ३०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे. हा प्रकल्प महाकेअर कंपनीमार्फत राबविण्यात येणार असून, व्यवस्थापनासाठी स्वतंत्र उपकंपनी स्थापन करण्यात येणार आहे.

यामुळे कर्करोग निदान, उपचार आणि संशोधनाला चालना मिळेल. त्याचा मध्य भारतातील अनेक शहरातील रुग्णांना उपयोग होऊ शकेल. या प्रकल्पामुळे नागपूर रेडिओफार्मास्युटीकल इनोव्हेशन हब म्हणून विकसित होईल; तसेच वैद्यकीय उपचारांमध्ये अचूकता येणार असून. मध्य भारतातील एकमेव महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. ज्यामुळे गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळणार. यात कर्करोगांशी विविध रोगांचे, आजारांचे निदान करण्यासाठी या प्रणालीचा वापर करता येणार आहे. देशातील कर्करोग रुग्णसंख्या वाढत असून पीईटी-सीटी व न्युक्लियर मेडिसीन सेवांसाठी आवश्यक रेडिओआयसोटोपची स्थानिक उपलब्धता सुनिश्चित करण्याचा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. हिंगणा तालुक्यातील भानसोली (किंही) येथील ३० हेक्टर जमीन सदर प्रकल्पासाठी देण्यास मान्यता देण्यात आली. प्रकल्पाचा अंदाजित प्रकल्प खर्च ३०० कोटी रुपये असून त्यापैकी १५० कोटी रुपये वैद्यकीय शिक्षण विभागामार्फत देण्यात येतील.

अंतिम प्रकल्प अहवालानंतर जमीन, बांधकाम, यंत्रसामग्री, मानव संसाधन इत्यादीसाठी निधी निश्चित केला जाईल. प्रकल्पासाठीचा खर्च वैद्यकीय शिक्षण विभाग व उद्योग विभाग यांच्यात ५०:५० खर्च वाटप करण्यासही मान्यता देण्यात आली. नागपूरचे भौगोलिक स्थान मध्यवर्ती असल्याने महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि आंध्रप्रदेशातील सुमारे ५०० किलोमीटर परिसरातील रुग्णांना लाभ या प्रकल्पाचा लाभ होणार आहे. नागपूरमध्ये एम्स, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युट आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असल्यामुळे या प्रकल्पासाठी नागपूर योग्य केंद्र आहे. या प्रकल्पामुळे मुंबई, हैदराबादवरील अवलंबित्व कमी होणार आहे. या प्रकल्पामुळे मध्य भारतातील कर्करोग निदान व उपचार सेवा बळकट होतील. पीईटी-सीटी व न्युक्लियर मेडिसीन सुविधा वाढतील. उपचारातील विलंब व वाहतूक खर्च कमी होईल. संशोधन, प्रशिक्षण व शैक्षणिक क्षमता वाढेल. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) स्थापन करण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली. यामध्ये वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त अध्यक्ष असतील. उद्योग विभागाचे विकास आयुक्त सहअध्यक्ष असतील. या विशेष हेतू कार्यवहन यंत्रणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सदस्य सचिव असतील. इतर संचालक पुढीलप्रमाणे आयुक्त, आरोग्य सेवा, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, आयुक्त, नागपूर महापालिका, जिल्हाधिकारी, नागपुर, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर, अधिष्ठाता, इं.गा. शा. वै.म. नागपूर, संचालक, एम्स, नागपूर, राष्ट्रीय कँन्सर संस्था, नागपूर, टाटा मेमोरिअल, आयआयटी मुंबई, आयआयएम, नागपूर, भाभा अँटॉमिक रिसर्च सेंटर किंवा आण्विक विज्ञान, किरणोत्सर्ग सुरक्षा आणि रेडिओफार्मास्युटिकल कामकाजाचा अनुभव असणाऱ्या प्रतिनिधींचा समावेश असेल. स्पेशल पर्पज व्हेईकल स्थापन होईपर्यंत प्रकल्पाचे काम सुकाणू समितीमार्फत पाहिले जाणार आहे. सुकाणू समितीमध्ये डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अध्यक्ष असतील. नागपूर महापालिकेचे आयुक्त डॉ. विपीन इटणकर सदस्य सचिव आहेत. वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, कॅन्सर केअर प्रकल्पाचे डॉ. कैलास शर्मा आणि नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटचे डॉ. आनंद पाठक सदस्य असणार आहेत.

# महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६ जाहीर

## जलजीवन मिशन २.० च्या देखभाल दुरुस्तीसाठी सर्वंकष आराखडा; पिण्याचे पाणी पुरवठ्यासाठी प्रभावी व कायमस्वरुपी उपाययोजना

**मुंबई -प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यासाठी प्रभावी व कायमस्वरुपी उपाययोजनांवर भर देणाऱ्या महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण - २०२६ ला मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणानुसार राज्यात राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशन २.० मधील योजनांच्या देखभाल दुरूस्तीसाठी सर्वंकष असा आराखडा तयार केला जाणार आहे.

ग्रामीण भागात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे एकत्रिकरण करून धोरण राबविण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना स्वच्छ, निर्जंतुक व दर्जेदार पाणी पुरवठा व्हावा यासाठीचे नियोजन केले जाणार. नव्या- जुन्या योजनांची पडताळणी करून, शाश्वत अशी योजना चांगल्या रितीने राबविण्यासाठी दीर्घकालीन नियोजन केले जाणार आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजन डॉक्युमेंटनुसार विकसित भारताच्या उद्दिष्टांशी सुसंगत असे हे महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६ राबविण्यात येणार आहे. यातून २०४७ पर्यंत राज्यातील ग्रामीण कुटुंबासाठी शाश्वत, स्वच्छ आणि कायमस्वरुपी अशी उपाययोजना केली जाणार आहे. अल्पकालीन, मध्यमकालीन व दीर्घकालीन टप्प्याचे नियोजन केले जाणार आहे. यातून नागरिकांसाठी १०० टक्के आणि समान प्रमाणात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहणार आहे. तसेच गावांची जल स्वयंपूर्णता, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करुन स्रोतांची शाश्वतता, जल संवर्धनासाठी पर्जन्य जल संकलन, सांडपाणी पुनर्वापर व पुनचक्रण यावर भर दिला जाईल. योजना चालविण्यासाठी आणि देखभाल दुरूस्तीचा शंभर टक्के खर्चाची पूर्तता. पाणी चोरी थांबविणे, सर्व योजना ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्यांना अथवा सामाजिक संस्थांना हस्तांतरीत करणे. सामाजिकदृष्ट्या वंचित व दुर्बल घटकांकरिता पाणी व स्वच्छता सुविधा उपलब्ध करणे, ग्रामपंचायतींचे सक्षमीकरण व त्याद्वारे शाश्वत पाणी व स्वच्छता व्यवस्थापन करणे, बहुग्राम पाणी पुरवठा योजनांकरिता स्काडा प्रणालीची अंमलबजावणी. पाणी व स्वच्छतेच्या मालमत्तांच्या रिअल टाईम देखरेख व्यवस्थापनासाठी डिजिटल प्लॅटफ़ॉर्मचा विस्तार करणे. पाणी व स्वच्छता सेवा व तक्रारींचे जीआयएस व डॅशबोर्ड आधारित रिअल टाइम ट्रॅकिंग अंमलात आणणे अशा गोष्टी साध्य करण्यात येणार आहेत.

या धोरणानुसार स्वतंत्र नळ पाणी पुरवठा तसेच प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरिता देखभाल दुरुस्ती निधी तसेच, एकत्रित निधी (कॉर्पस फंड) संबंधित ग्रामपंचायत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद स्तरावर निर्माण करण्यात येईल. हा निधी ग्रामपंचायती, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, अंमलबजावणी यंत्रणांना भांडवली व पाणी पुरवठा योजना देखभाल दुरुस्ती कामासाठी वापरता येईल.

# खरपुडी शिवारात पोलिसांची मोठी धाड; ३०० ते ३५० ब्रास अवैध वाळू साठा जप्त

## अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई; संबंधितांवर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील खरपुडी शिवारात अवैधरित्या साठवून ठेवलेल्या वाळूवर पोलिसांनी मोठी धाड टाकत अंदाजे ३०० ते ३५० ब्रास वाळूचा साठा जप्त केला. जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन, वाहतूक आणि साठवणुकीविरोधातील विशेष मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, खरपुडी शिवार परिसरात मोठ्या प्रमाणावर वाळूचा अवैध साठा करण्यात आल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. या माहितीची पडताळणी करून पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकला. कारवाईदरम्यान घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर वाळूचा साठा आढळून आला. प्राथमिक पाहणीत हा साठा अंदाजे ३०० ते ३५० ब्रास असल्याचे समोर आले आहे.

सदर वाळू साठ्याचे अचूक मोजमाप महसूल विभागाच्या मदतीने करण्यात येणार असून त्यानंतर त्याची बाजारमूल्यानुसार किंमत निश्चित केली जाणार आहे. संबंधित वाळू साठा कोणी केला, तो कोणत्या ठिकाणाहून आणण्यात आला आणि त्यामागील आर्थिक साखळी काय आहे, याचा तपास सुरू करण्यात आला आहे. तपासाअंती दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर गौण खनिज नियमांसह इतर लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई केली जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून अवैध वाळू उपसा आणि वाहतूक रोखण्यासाठी पोलीस व महसूल प्रशासनाकडून संयुक्त मोहिमा राबविण्यात येत आहेत. नदीपात्रांमधून होणारा बेकायदेशीर वाळू उपसा पर्यावरणीय संतुलनासाठी घातक ठरत असल्याने प्रशासनाने अशा प्रकारांविरोधात शून्य सहनशीलतेची भूमिका घेतली आहे.

पोलिसांनी नागरिकांनाही आवाहन केले असून, आपल्या परिसरात अवैध वाळू उपसा, वाहतूक किंवा साठवणूक होत असल्याची माहिती मिळाल्यास तत्काळ प्रशासनाला कळवावी, असे सांगितले आहे. जनतेच्या सहकार्यानेच अशा बेकायदेशीर प्रकारांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य होणार असल्याचे प्रशासनाने नमूद केले.

**संयुक्त पथकाची कारवाई**

ही कारवाई मा. श्री. विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत सपोनी योगेश खटकळ, पोलीस अंमलदार गायकवाड तसेच स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) आणि तालुका जालना पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होते. संयुक्त पथकाने केलेल्या या धाडसी कारवाईमुळे अवैध वाळू साठवणूक करणाऱ्यांना मोठा दणका बसला आहे.

**प्रशासनाचा इशारा**

जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन, वाहतूक आणि साठवणूक करणाऱ्यांविरोधात यापुढेही अधिक तीव्रतेने कारवाई सुरू राहणार असून कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पोलीस व प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# दत्तनगर जिल्हा परिषद शाळा टेंभुर्णी येथे शाळा प्रवेश उत्सव उत्साहात साजरा



**दत्ता देशमुख**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दत्तनगर टेंभुर्णी येथे विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. आनंदाच्या वातावरणात प्रत्येक विद्यार्थ्यांचा प्रवेश हा आनंददायी असला पाहिजे व विद्यार्थ्यांना शाळेत येण्यास आनंद वाटला पाहिजे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका जामदार मॅडम यांनी याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात आपले मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे पुस्तक वाटप अरुण स्वागत करण्यात आले. यावेळेस प्रत्येक विद्यार्थ्यांनी आनंदाने पुस्तक घेतली नवीन पुस्तका असल्याने विध्यार्था मध्ये यावेळी आनंद दिसला. सात खेळत रमत कमत शाळेमध्ये येणे आणि अभ्यास करणे हा विद्यार्थ्यांचा स्थायीभाव असतो. यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्न करू असेही यावेप्रसंगी सांगितल्यात आले. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री योगेश गडकर मुख्याध्यापक मीना जामदार मॅडम शिक्षक श्रीकृष्ण आव्हाळे सर. सौ. संध्या ताई लोखंडे मॅडम. सौ. अश्विनीताई उगले मॅडम व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टेंभुर्णी जिल्हा परिषद शाळेत उत्साहात प्रवेशोत्सव

## पहिल्याच दिवशी पुष्पगुच्छ, पाठ्यपुस्तके आणि मिठाई देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी गुरुजी शाळेत येण्यापूर्वीच विद्यार्थी गेटवर हजर होते. त्यांनी गुड मॉर्निंग सर म्हणत शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

शाळेचे कुलूप उघडताच मुख्याध्यापक अशोक हरकळ आणि शिक्षिका प्रणिती वाहुळे यांनी इयत्ता पहिलीतील नव्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांना नवकोरी



पाठ्यपुस्तके दिली. वर्गात प्रवेश करताच शिक्षिका मंगला साने यांनी काढलेल्या सुरेख रांगोळ्या आणि चित्रांनी विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले. कला शिक्षक देशपांडे आणि सानप यांनी गाणी व कविता सादर केल्या. त्यानंतर शिक्षक आनंदा माने यांनी विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेत नेऊन तंत्रज्ञानाची माहिती दिली. सकाळी अकरा वाजता विद्यार्थ्यांना रांगेत बसवून पोषण आहार देण्यात आला. तसेच शिक्षक देशपांडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप केले. हसत खेळत शिक्षण या सूत्रानुसार पहिल्या दिवसाची सांगता देशभक्तीपर गीते आणि कवितांनी झाली. या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल शालेय व्यवस्थापन समिती आणि पालकांनी शिक्षकांचे (पान २ वर)

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते शाळा प्रवेशोत्सव संपन्न



**जालना - प्रतिनिधी**

नव्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रवेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पहिल्या दिवशी, सोमवार १५ जून रोजी जिल्ह्यातील विविध शाळा मध्ये शाळा प्रवेशोत्सव उत्साहात पार पडला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पीएम श्री' जिल्हा परिषद प्रशाला, सेलगाव (ता. बदनापूर) येथे भेट देवून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी श्रीमती मित्तल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, त्यांना नव्या शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी त्यांनी शाळा परिसराची पाहणी करत, स्वच्छता व (पान २ वर)

# अहिल्यादेवी प्राथमिक विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात

**दत्ता देशमुख**

शिवनगर परिसरातील अहिल्यादेवी प्राथमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नव्याने प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

विद्यार्थी व पालकांसाठी आकर्षक सेल्फी पॉईंटची व्यवस्था करण्यात आली होती. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी आनंदाने सेल्फी काढून प्रवेशोत्सवाच्या आठवणी जतन



केल्या. तसेच विद्यार्थ्यांच्या हातात ‘‘माझा प्रवेश निश्चित‘‘ असे स्टार देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. शासनाकडून उपलब्ध मोफत पाठ्यपुस्तकांचेही विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास शाळेच्या अध्यक्षा श्रीमती शोभाताई येवले, सचिव श्री दिनेश येवले, मुख्याध्यापिका श्रीमती इंगळे तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना (पान २ वर)

# जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी जवळून जवळच असलेल्या काळेगाव येथून अवैध वाळू वाहतुकीवर महसूल व पोलिसांची संयुक्त धडक कारवाई

## ८ टिप्पर व १जेसीबी जप्त

**दत्ता देशमुख**

माननीय जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी बी. सरवनन आणि तहसीलदार अविनाश लोढे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १५/०६/२०२६ रोजी रात्री जाफराबाद तालुक्यातील काळेगाव शिवारातील बोबडेवाडी परिसरात अवैध गौण खनिज वाळू उत्खनन व



वाहतुकीविरोधात मोठी संयुक्त कारवाई करण्यात आली.

या कारवाईदरम्यान अवैधरीत्या वाळूची वाहतूक करणारे ८ टिप्पर व १ जेसीबी मशीन जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेली वाहने पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी टेंभूर्णी पोलीस ठाण्यात लावण्यात आली आहेत.

जाफराबाद तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतुकीविरोधात करण्यात आलेल्या कारवायांमध्ये ही आतापर्यंतची सर्वात मोठी आणि प्रभावी कारवाई मानली जात आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली असून प्रशासनाने अवैध उत्खनन व वाहतुकीविरोधात कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

सदर कारवाई महसूल विभाग व टेंभूर्णी तसेच जाफराबाद पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकाने केली. या पथकात ग्राम महसूल अधिकारी बी. जी. ब्राम्हणे, अंकुश सोनवणे, अरुण गावंडे, प्रभाकर शेणेवाड, अमोल मुरकुटे, रविंद्र वैध, गंगाधर गायकवाड, अक्षय येळवंते, माधव साळवे, महसूल सेवक भगवान इंगळे, राजू खांडेभराड तसेच पोलीस कर्मचारी राजेंद्र डोईफोडे, राम मोरे व (पान २ वर)

# दामिनी पथकाची धडक कारवाई; टवाळखोरांना दिला कडक इशारा

## महिलांच्या सुरक्षिततेसाठी पथक ॲक्शन मोडवर; चौपाटी व उद्यान परिसरात विशेष मोहीम

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील तरुणी व महिलांची छेड काढणाऱ्या टवाळखोरांविरोधात जिल्हा पोलीस दलाच्या दामिनी पथकाने धडक कारवाई सुरू केली असून, सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेला बाधा आणणाऱ्या व्यक्तींना कडक इशारा देण्यात आला आहे. सोमवारी दामिनी पथकाने छत्रपती संभाजी महाराज उद्यान आणि मोतीबाग चौपाटी परिसरात विशेष तपासणी मोहीम राबवत संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या



युवकांची चौकशी केली. यावेळी अनेकांना समज देण्यात आली असून भविष्यात अशा प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

अलिकडच्या काळात शहरातील विविध भागांत महिलांची व महाविद्यालयीन तरुणींची छेड काढणे, पाठलाग करणे, अश्लील टिप्पणी करणे तसेच सार्वजनिक ठिकाणी त्रास देण्याच्या तक्रारी वाढत असल्याचे समोर आले होते. या पार्श्वभूमीवर महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युतीचे जिल्हाध्यक्ष शितल बारोटे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देत दामिनी पथक अधिक प्रभावीपणे कार्यान्वित करण्याची मागणी केली होती. या मागणीची गांभीर्याने दखल घेत जिल्हा पोलीस प्रशासनाने तातडीने (पान २ वर)

# जालना येथे शेतकरी विकास मंचाचे नायब तहसीलदारांना निवेदन

## निकष बदलून १०० टक्के सरसकट कर्जमाफीची मागणी

**जालना - प्रतिनिधी**

शेतकरी विकास मंच महाराष्ट्रच्या वतीने जालना तहसील कार्यालयात नायब तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले. ‘‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६‘‘ अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या कर्जमाफीच्या निकषांमध्ये बदल करून सर्व शेतकऱ्यांना १०० टक्के सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले



आहे की, शासनाने यापूर्वी राज्यातील शेतकऱ्यांचे ७/१२ कोरे करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये विविध अटी व निकष लागू करण्यात आल्याने अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाचे आश्वासन पूर्ण होणार नसल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. राज्यात वाढत असलेल्या शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर शेतकरी (पान २ वर)

# अल्पसंख्यांक संरक्षण कायद्यासाठी मुंबईतील आझाद मैदान येथे होणाऱ्या आंदोलनास जाहीर पाठिंबा - प्रा. अमर शेख

## अल्पसंख्यांक समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

**दत्ता देशमुख**

राज्यासहित देशभरात अल्पसंख्यांक समाजावर गेल्या काही वर्षांपासून सतत होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून संरक्षण मिळावे यासाठी मुंबई येथील आझाद मैदानावर अधिवेशन काळात दिनांक २२ जून पासून अल्पसंख्यांक संरक्षण संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य, तर्फे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी लाक्षणिक आंदोलन करण्यात येणार असून या आंदोलनास राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पदवीधर संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष तथा या समितीचे सदस्य प्रा. अमर शेख यांनी जाहीर पाठिंबा देत असल्याचं प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे, गेल्या अनेक वर्षांपासून अल्पसंख्यांक समाजातील एका मुस्लिम समाजाला टार्गेट करून त्यांच्यावर वारंवार अन्याय,अत्याचार करणे, मॉब लिचिंग करणे, मुस्लिम समाजाच्या बाहेरच्या स्त्रियांनी बुरखा घालून ब्राम्हण गल्लीत मांस फेकून मुस्लिम समाजाची जाणीवपूर्वक बदनामी करून द्वेष पसरविण्याचा प्रयत्न करणे, मुद्दामहून धार्मिक स्थळांची मोडतोड करून वातावरण खराब करणे,जाफराबाद आणि परळी सारख्या ठिकाणी अमानुष मारहाण करून मर्डर करणे,सामाजिक सलोखा बिघडविण्यासाठी जाणीवपूर्वक बेताल वक्तव्य करणे अशा (पान २ वर)

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथे शाळा प्रवेशोत्सव आनंदात साजरा



**दत्ता देशमुख**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा येथे सन २०२६-२७ अंतर्गत इयत्ता पहिलीच्या प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे तालुक्याचे गटविकास अधिकारी सन्माननीय श्री गगन बोने साहेब व शिक्षण विस्तार अधिकारी श्री के जी राठोड सर यांच्या हस्ते नवागताचे पुष्प ,फुगे ,पुस्तक व गणवेश देऊन स्वागत करण्यात आले . याप्रसंगी मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सर स. शि. श्री निलेश पिसे सर श्री पंजाब दांदडे सर शाळा व्यवस्थापन समिती ग्रामपंचायत कार्यालय व पालक यांची उपस्थिती होती.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.